## MAHARASHTRA ACT No. XXXI OF 1989.

## THE DRUGS AND COSMETICS (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1989.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २८ सप्टेंबर १९८९ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXI OF 1989.

## AN ACT FURTHER TO AMEND THE DRUGS AND COSMETICS ACT, 1940, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ४ ऑक्टोबर १९८९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

### सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

### औषधिद्रव्य व सौंदर्यप्रसाधन अधिनियम, १९४०, हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९४० चा २३. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, औषधिद्रव्य व सौंदर्यप्रसाधन अधिनियम, १९४०, हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, औषधिद्रव्य व सौंदर्यप्रसाधन (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८९ असे म्हणता येईल. संक्षिप्त

१९४० चा २३. २. औषधिद्रव्य व सौंदर्यप्रसाधन अधिनियम, १९४० (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना, त्याच्या कलम ३३, पोट-कलम (२) मध्ये,— सन १ अधि क्रमां याच्य ३३ सुधा

(अ) खंड (ङ) मध्ये, "व त्यासाठी देय असलेली फी" हा मजकूर वगळण्यात येईल;

(ब) खंड (ङ्‌ङ्‌क्) वगळण्यात येईल; आणि

(क) खंड (ण्) मधील, "व त्यासाठी प्रदेय असलेली फी" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९४० चा अधिनियम क्रमांक २३ यात कलम ३३-१ क समाविष्ट करणे.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ३३ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

नियम करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

"३३-१ क. राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे व पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, या प्रकरणाच्या पुढील प्रयोजनांकरिता प्रदेय असलेली फी विहित करण्यासाठी नियम करता येतील :—

(अ) औषधिद्रव्ये किंवा कोणतीही विनिर्दिष्ट औषधिद्रव्ये किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गातील औषधिद्रव्ये अथवा सौंदर्यप्रसाधने किंवा कोणतीही विनिर्दिष्ट सौंदर्यप्रसाधने किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गातील सौंदर्यप्रसाधने यांची विक्रीकरिता, निर्मिती करण्यासाठी किंवा विक्रीकरिता वितरण करण्यासाठी आणि वितरण करण्यासाठी लायसन देणे किंवा त्याचे नूतनीकरण करणे ;

(ब) जेथे कोणतेही औषधिद्रव्य किंवा सौंदर्यप्रसाधन यांची निर्मिती करण्यात येत आहे किंवा निर्मिती करण्यात यावयाची आहे अशा जागेची (लायसन देण्याच्या किंवा त्याचे नूतनीकरण करण्याच्या प्रयोजनार्थ) तपासणी करणे;

(क) कोणतेही औषधिद्रव्य किंवा सौंदर्यप्रसाधन यांची शासकीय विश्लेषकाकडून चाचणी किंवा विश्लेषण करवणे; आणि

(ड) ज्याकरिता या प्रकरणान्वये फी विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.".

सन १९४० चा अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ३३-ढ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाचे कलम ३३-ढ च्या पोट-कलम (२), खंड (ड्) मध्ये, "व त्यासाठी देय असलेली फी" हा मजकूर वगळण्यात येईल.

१९४० 'नियम क २३ कलम -ढ १ विष्ट रणे.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ३३-ढ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

प्रम याचा राज्य गचा ार.

"३३-ढ १. राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे व पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, या प्रकरणाच्या पुढील प्रयोजनांकरिता देय असलेली फी विहित करण्यासाठी नियम करता येतील :—

(अ) आयुर्वेदिक, सिद्ध व युनानी औषधिद्रव्यांची विक्रीकरिता निर्मिती करण्यासाठी आणि प्रक्रिया केलेल्या आयुर्वेदिक, सिद्ध किंवा युनानी औषधिद्रव्यांच्या विक्रीसाठी लायसन देणे किंवा त्याचे नूतनीकरण करणे ;

(ब) जेथे कोणत्याही आयुर्वेदिक, सिद्ध किंवा युनानी औषधिद्रव्याची निर्मिती करण्यात येत आहे किंवा करण्यात यावयाची आहे अशा जागेची (लायसन देण्याच्या किंवा त्याचे नूतनीकरण करण्याच्या प्रयोजनार्थ) तपासणी करणे;

(क) कोणत्याही सिद्ध आयुर्वेदिक औषधिद्रव्याची किंवा युनानी औषधिद्रव्याची शासकीय विश्लेषकाने केलेली चाचणी किंवा विश्लेषण; आणि

(ड) ज्या बाबीसाठी या प्रकरणाखाली फी विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.".

सन १९४० चा अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ३८ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ३८ मध्ये "केलेला प्रत्येक नियम" या मजकुराऐवजी "केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम" असा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४० चा अधिनियम क्रमांक २३ मध्ये कलम ३९ समाविष्ट करणे.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ३८ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

राज्य विधानमंडळासमोर नियम ठेवणे.

"३९. या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरितां, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त अधिवेशनाच्या किंवा लागोपाठच्या अधिवेशनांच्या लगेच पुढचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी या नियमामध्ये कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल झाली किंवा असा नियम करण्यात येऊ नये यास दोन्ही सभागृहे कबूल झाली आणि त्यांनी असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित केला तर, तो नियम अशी अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति अंमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.".

औषधिद्रव्य व सौंदर्यप्रसाधन नियमाच्या १४-अ आा १९-अ या नमुन्यांची सुधारण

८. औषधिद्रव्य व सौंदर्यप्रसाधन नियम, १९४५ च्या अनुसूची अ मध्ये,—

(अ) नमुना १४-अ मध्ये बाब क्रमांक ७ ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"७. रुपये ............. एवढी फीची रक्कम .................. लेखा शीर्षाखालील शासकीय खात्यामध्ये जमा करण्यात आलेली आहे.";

(ब) नमुना १९-अ मध्ये,—

(एक) बाब क्रमांक ६ मध्ये "पाच" / "वीस", हे शब्द वगळण्यात येतील;

(दोन) "फिरत्या विक्रेत्यांसाठी रुपये पाच" या शब्दांनी सुरू होणारा व "निर्बंधित लायसन्ससाठी रुपये वीस." या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

प. ग. पाटील
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.